# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.06.2025** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज बिहारमधल्या 5 हजार 9 शे कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचं उद्घाटन.
2. कैलास मान सरोवर यात्रेला आजपासून सिक्कीम इथून सुरूवात.
3. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचं आज पुण्यात आगमन
4. इस्रायल–इराण संघर्ष तीव्र, अमेरिकेनं लष्करी हस्तक्षेप केल्यास गंभीर परिणाम होतील असा इराणचा इशारा आणि
5. भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या पाच सामन्यांच्या तेंडुलकर-अँडरसन चषक क्रिकेट कसोटी मालिकेला आज सुरुवात

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बिहार राज्याच्या दौऱ्यावर असून, ते या दौऱ्यात 5 हजार 9 शे कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचं उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. यामध्ये विविध नवीन रेल्वे गाड्यांचा शुभारंभ, पंतप्रधान घरकुल योजना, नमामी गंगे योजनेअंतर्गत 6 मैला शुद्धीकरण प्रकल्पांच उद्घाटन आदि विकासकामांचा समावेश आहे. पंतप्रधान आज दुपारी बिहार मधल्या सिवन जिल्ह्यातल्या जसाउली इथं जाहीर सभा घेणार असून त्यानंतर दूरस्थ पद्धतीने त्यांच्या हस्ते विकास कामांचं उद्घाटन आणि कोनशीला समारंभ होणार आहे. पंतप्रधान मोदी आज दुपारी ओडीशा दौऱ्यावरही जात असून भाजपच्या नेतृवाखालील राज्यसरकरला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमिताने भुवनेश्वर इथ आयोजित विशेष कार्यक्रमात ते उपस्थित राहणार आहेत. यावेळी मोदी यांच्या हस्ते ओडीशा मधील 18 हजार 6 शे कोटीं पेक्षा जास्त खर्चाच्या विकास कामांच उद्घाटन आणि पायाभरणी समारंभ होणार आहे

**राष्ट्रपती**

उत्तराखंड मधील डेहराडून इथल्या राष्ट्रपती निकेतन इथ आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विविध विकास कामांच उद्घाटन आणि पायाभरणी होणार आहे. यावेळी त्यांच्या हस्ते राष्ट्रपती निकेतन आणि राष्ट्रपती तपोवन नागरिकांना पाहण्यासाठी खुल करण्यात येणार आहे. तसच 132 एकर परिसरात विकसित करण्यात येणाऱ्या नवीन राष्ट्रपती उद्यानाचा कोनशीला समारंभही यावेळी राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे.

**अश्विनी वैष्णव**

केंद्रीय रेल्वे आणि माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल रशियातील सेंट पीटर्सबर्ग इथ रशियाचे उपपंतप्रधान एलेक्सी ओवरचुक यांची भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली. यावेळी भारत आणि रशिया दरम्यान मुख्यतः परिवहन,संपर्क यंत्रणा, पायाभूत सुविधा आणि दुर्मिळ धातू या क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा झाली. ही चर्चा सकारात्मक आणि सफल झाल्याच अश्विनी वैष्णव यांनी समाज माध्यमावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात म्हंटल आहे. रशियातील सेंट पीटर्सबर्ग इथ 18 ते 21 जून दरम्यान सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत भाग घेण्यासाठी सध्या अश्विनी वैष्णव रशियाच्या दौऱ्यावर आहेत.

**कैलास मानसरोवर यात्रा**

कोविड संकटानंतर दीर्घकाळाने सुप्रसिद्ध कैलास मान सरोवर यात्रा आजपासून सिक्कीम इथून सुरू होत आहे. सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथुर आज सकाळी नथुला इथून यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीला रवाना करणार आहेत. यावेळी राज्यपाल भविकांशी संवादही साधणार आहेत. ही यात्रा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी सिक्कीम सरकार आणि केंद्रसरकारचे विविध प्रशासकीय विभाग समन्वयाने काम करत असल्याची माहिती राज्याचे पर्यटन आणि नागरी विमान अप्पर मुख्य सचिव सी एस राव यांनी दिली.

**योगदिन**

अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन उद्या 21 जूनला साजरा होणार आहे. आयुष मंत्रालयानं विशाखापट्टणम इथं आयोजित केलेल्या मुख्य समारंभामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी योग प्रात्यक्षिकं सादर करणार आहेत. तर सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं देशभरातील 100 पर्यटन स्थळांवर योग

दिन साजरा करण्यात येणार आहे.दरम्यान आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी योग ही एक जीवनशैली आहे असं सांगत योगाभ्यासाचा दैनंदिन जीवनात समावेश करण्याचं आवाहन केलं आहे....

**योग एक कुछ एक दिन का इवेंट नहीं योग को अपनी जीवनशैली बनाना चाहिए और हमारे प्रधानमंत्री ने भी ये संदेश दिया है कि योग को अपनी जीवनशैली बनाओ अपने जीवन में योग को स्थान दो और योग के माध्यम से तंदुरुस्त रहो आप तो खुद योगा हर रोज करो योगा के लिए समय दो लेकिन आपके परिवार में जो भी लोग हो बुजुर्ग हो माता बहने हो बच्चे हो सभी को योगा करने के लिए प्रवर्तन करें।**

**कुछ लोग सोचते हैं योग के लिए फ्लेक्सिबिलिटी चाहिए लेकिन फ्लेक्सिबिलिटी तो सोच में होनी चाहिए ना, ना कोई बंधन,ना कोई बॉडी टाइप बचपन हो या पचपन, व्हील चेअर हो या वर्क फ्रॉम होम, योग सबका हक है... योग जीवन से जब जुडता है, एक सहज क्रिया बन जाता है, तो वो प्रतिफल उसका बेनिफिट देता रहता है... आइये इस इक्कीस जून हम सब हिस्सा बने अंतरराष्ट्रीय योग दिवस का और करे स्ट्रेच एंड चिल योग के साथ...**

## पालखी सोहळा

टाळ मृदुंगाच्या निनादात आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात, भक्तिमय वातावरणात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यानं आषाढी वारीसाठी काल आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं. रात्री आठनंतर प्रस्थान सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर रात्री उशिरा मंदिर आणि शहर प्रदक्षिणा झाल्यावर पालखी सोहळा आजोळघरी विसावला. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा काल पिंपरी चिंचवड शहरात दाखल झाला. त्यानंतर आकुर्डीच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये हा पालखी सोहळा मुक्कामासाठी विसावला. जगदगुरु संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचं आज पुण्यात आगमन होणार आहे. त्यांच्या स्वागतासाठी पुण्यनगरी सज्ज झाली आहे. पुणे जिल्हा प्रशासन आणि पुणे महापालिकेतर्फे वारकऱ्यांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

## फिरते चित्ररथ

गेल्या अकरा वर्षांच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एक शक्तिशाली, सामर्थ्यवान राष्ट्र म्हणून भारत जगभरात नावाजला जात आहे; असे गौरवोद्गार केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात काढले. केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी केंद्रीय संचार ब्युरोनं पालखी मार्गांवर फिरत्या प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. या अंतर्गत दोन चित्ररथांचं उद्घाटन मोहोळ यांच्या हस्ते काल झालं; त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पश्चिम क्षेत्र महासंचालक, स्मिता वत्स शर्मा उपस्थित होत्या. यावेळी भारुड, अभंग, गवळण यासारख्या महाराष्ट्राच्या लोककलांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या योजनांची माहिती देण्यात आली. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या पालख्यांच्या मार्गांवर हे चित्ररथ विविध गावांत फिरून केंद्र सरकारच्या योजनांची माहिती देणार आहेत; तसंच या माध्यमातून संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या जीवनावर आधारित जीवनपटही दाखवण्यात येणार आहेत.

## इस्रायल-नेतन्याहू

इस्रायलनं काल तेहरानमधील इराणचं अंतर्गत सुरक्षा मुख्यालय उद्ध्वस्त केलं तर इराणी क्षेपणास्त्रांनी एका प्रमुख इस्रायली वैद्यकीय सुविधेवर हल्ला केला. इस्रायली सैन्यानं तेहरान जवळच्या कारज शहरातील सरकारी सुविधा तसंच पायम विमानतळासह इराणमधल्या अनेक मोक्याच्या ठिकाणांना लक्ष्य केलं. इस्रायलमधील बेरशेबा इथल्या सोरोका मेडिकल सेंटरवर इराणनं क्षेपणास्त्रे डागल्यानंतर काही तासांतच हे हल्ले झाले.सोरोका मेडिकल सेंटरवरील हल्ल्याचा इस्रायली नेतृत्वाकडून तीव्र निषेध करण्यात आला आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी इराणमधील मोक्याच्या ठिकाणांना लक्ष्य करून लष्करी कारवाया तीव्र करण्याची योजना जाहीर केली आहे. दरम्यान, इस्रायल इराणमधील संघर्षात अमेरिकेच्या लष्करी सहभागाबद्दल पुढील दोन आठवड्यात निर्णय अपेक्षित असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. मात्र अमेरिकेनं या संघर्षात हस्तक्षेप केला तर त्याचे गंभीर दुष्परिणाम होतील असा इशारा इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांनी दिला आहे.

## शाह-बेंगळुरू

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह काल बेंगळुरूमध्ये भाजपचे ज्येष्ठ नेते आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी.एस. येडियुरप्पा यांची भेट घेतली. आज शाह आदिचुंचनागिरी विद्यापीठाच्या बेंगळुरू इथल्या संकुलाचं उद्घाटन करतील. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज महाराष्ट्राच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी मुंबईत आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने आयोजित राष्ट्रीय परिसंवादात ते सहभागी होणार आहेत. तसेच

यशवंतराव चव्हाण सेंटर इथ आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री आणि अग्रिकल्चर नवीन मुख्यालय भवनाचं उद्घाटन तसेच राज्यस्तरीय सहकारी औद्योगिक संमेलनाच्या कार्यक्रमालाही अमित शहा उपस्थित राहणार आहेत

**बुद्धिबळपटू दिव्या**

लंडनमधील वर्ल्ड टीम ब्लिट्झ अजिंक्यपदस्पर्धेत उपांत्य फेरीच्या दुसऱ्या टप्प्यात जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाची खेळाडू असलेल्या हौ यिफान हिला पराभूत केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताची बुद्धिबळपटू दिव्या देशमुखचं अभिनंदन केलं आहे. दिव्याचं हे यश तिच्या धैर्य आणि दृढनिश्चयाला अधोरेखित करतं आणि ते अनेक भावी बुद्धिबळपटूंना देखील प्रेरणा देईल, असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**क्रिकेट-भारत-इंग्लंड**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या तेंडुलकर-अँडरसन चषकाच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिली क्रिकेट कसोटी आज इंग्लंडमधल्या हेडिंग्ले, लीड्स इथं होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी साडे तीन वाजता सुरू होईल. नवनियुक्त भारतीय कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ या सामन्याला सामोरा जाणार आहे. दरम्यान, काल अनुभवी खेळाडू जेम्स अँडरसन आणि सचिन तेंडुलकर यांच्या उपस्थितीत अँडरसन-तेंडुलकर चषकाचं अनावरण करण्यात आलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल.

# नमस्कार.